५.२०
२८-६-२४

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

दुरध्वनी क्र. ०२५१ - २७२०११६, विस्तार क्र.२२५
proumc321@gmail.com

दिनांक :२८/०६/२०२४

**विषय : उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विनापरवानगी अनधिकृत टपरीवर गुटका, तंबाखू, सिगारेट विक्री करणा-याविरुध्द कारवाई.**

## प्रसिध्दी पत्रक

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी विनापरवानगी अनधिकृत टपरीवर गुटका, तंबाखू, सिगारेट विक्री करणा-याविरुध्द धडक कठोर कारवाई करणेसाठी मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अझीझ शेख यांनी सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांना आदेश दिले होते.

त्यानुसार आज दिनांक २८.०६.२०२४ रोजी अतिरिक्त आयुक्त (२) श्री. किशोर गवस, यांचे मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त, प्रभाग समिती व पोलीस विभागाने शहरातील विविध ठिकाणी विनापरवानगी अनधिकृत एकुण ११ टप-या हटविण्यात आल्या असून विनापरवानगी अनधिकृत गुटका, तंबाखू, सिगारेट विक्री करणा-याविरुध्द दंडात्मक संयुक्त धडक कारवाई करण्यात आली आहे. या विशेष मोहिमेत दंडात्मक करावाईपोटी एकुण ७०००/- एवढा दंड वसुल करण्यात आला असून संबंधिताकडून गुटका, तंबाखू, सिगारेट इत्यादी अंदाजे रु. ५० हजाराचा मुद्येमाल जप्त करण्यात आलेला आहे.

यापुढे देखिल उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात विनापरवानगी अनधिकृत टपरीवर गुटका, तंबाखू, सिगारेट विक्री करणा-याविरुध्द दैनदिन नियमितपणे महापालिकेमार्फत धडक कठोर कारवाई सुरु ठेवण्याचे आदेश मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, यांनी सर्व सहायक आयुक्त, प्रभाग समिती यांना आदेश दिलेले आहेत.

२८/६/२४

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत – माहितीस्तव
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका
प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.
१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करवी.